स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :-११ मे, २०२३

जळगाव दि. ११ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व श्री. संत सद्गुरु सखाराम महाराज विठ्ठल रुख्मीणी संस्थान अमळनेर/पंढरपूर जि जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने १७ मे रोजी प्लास्टीक मुक्त वारी – हरित वारीचे व संत संमेलन अमळनेर येथे आयोजित करण्यात आले आहे.

हा उपक्रम बुधवार दिनांक १७ मे २०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता अमळनेर येथील श्री. संत सद्गुरू सखाराम महाराज भक्त निवास येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात क्रिएटिव्ह पर्यावरण दक्षता कृती मंच आणि कमिन्स इंडिया फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. प्रशांत अवचट ( पर्यावरण तज्ज्ञ) हे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. व्ही. एल. माहेश्वरी हे तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरण तज्ज्ञ व विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्यवस्थापन परिषद सदस्य अमोल पाटील हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तरी पंढरपूर वारीत सहभागी होणाऱ्या वारकरी बांधवांनी सदर उपक्रमात सहभागी होऊन, पंढरीची वारी संतांनी आखून दिलेल्या पर्यावरण पूरक पद्धतीने पूर्ण करावी असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच खान्देशात हा पहिला उपक्रम कुलगुरूंच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असल्याची माहिती रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी दिली. या वारीत सहभाग व अधिक माहितीसाठी अमळनेर येथील वाढी संस्थानातील महेश दुसाने, उदय देशपांडे, रमेश जोशी, अरुण बापू पाटील, रा. से. यो.जिल्हा समन्वयक डॉ.मनीष करंजे विभागीय समन्वयक डॉ.संजय शिंगाणे, डॉ. जगदीश सोनवणे यांच्याशी संपर्क करावा असे रासेयो विभागाकडून कळविण्यात आले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी